# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :-3143./शि.वि./सशिअ

दिनांक – 30/08/2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
प्राथमिक/उच्च प्राथ. शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय – सन 2014–15 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमध्ये "अभ्यास जत्रा" या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ –जा.क्र. मप्राशिप/सशिअ/गुणवत्ता/अभ्यास जत्रा/2014–15/3319 दि. 20/8/2014**

अध्ययन समृध्दी कार्यक्रम हा अत्यंत महत्वाकांक्षी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असून या कार्यक्रमाची अंमलबजावणी महानगरपालिका स्तरावरून प्रभावीपणे व परिणामकारकरित्या करून विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीत इष्ट वाढ होण्यासाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत अध्ययन समृध्दी कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. त्यामध्ये प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावर संपादणूक पातळीमध्ये किमान 5% वाढ करणे हे अध्ययन समृध्दी कार्यक्रमाचे प्रमुख उदिष्ट निर्धारित करण्यात आले होते. त्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य, हस्तपुस्तिका, गणित, विज्ञान साहित्य संच पेटी, घटकसंच व प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्राथमिक शाळांमध्ये नंदादीप शाळा हा उपक्रम राबविण्यासाठी आर्थिक तरतूद व आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

राष्ट्रीय व राज्य स्तरावरील विविध संस्थांकडून विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या अहवालावरून विद्यार्थ्यांची गणित, व भाषा या विषयांची संपादणूक पातळीत प्रगती करण्याची गरज असल्याचे निष्कर्ष प्रसिध्द करण्यात आले आहेत. ज्ञानरचनावादात विद्यार्थ्यांनी त्यांच्या ज्ञानाची रचना करणे, शिकलेल्या भागाचे उपयोजन करणे आवश्यक आहे. अध्ययन समृध्दी कार्यक्रमांतर्गत शिक्षणोत्सव हा उपक्रम भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र या विषयांतील विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीत वाढ करण्यासाठी बालकेंद्रित उपक्रमाचे आयोजन करून राबविण्यात आला आहे. त्याचधर्तीवर आधारित पालकांना व समाजाला विद्यार्थ्यांनी अवगत केलेल्या ज्ञानावर आधारित सादरीकरण करण्यासाठी राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नागपूर महानगरपालिकाच्या शाळांमध्ये **"अभ्यास जत्रा"** या कार्यक्रमाचे आयोजन सन 2014–15 या वर्षापासून करण्यात येत आहे. जेणेकरून **विद्यार्थ्यांना** प्रत्यक्षात विषयातील घटकाची समजूत, उपयोजन, आत्मविश्वास व कृतीयुक्त शिक्षणास वाव मिळेल.

**कार्यक्रमाची उदि्दष्टे :–**

1. विद्यार्थ्यांच्या आजूबाजूचा परिसर, रोजच्या जीवनातील अनुभव (Contextualization of Education), कृतीयुक्त शिक्षण (Learning by doing) या विविध माध्यमांचा उपयोग करून मुलामुलींना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात टिकविणे.
2. उपलब्ध साहित्य साधनसामुग्रीचा उपयोग करून शिक्षक व विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करणे.
   - विद्यार्थ्यांचा रचनात्मक दृष्टीकोन (Constructivist Approach) विकसित करणे.
   - विविध अध्ययन पध्दतीचा वापर सक्षमपणे करणे.
3. विद्यार्थ्यांच्या जीवनातील शैक्षणिक व सामाजिक अनुभवातील तफावत दूर करून शिक्षण जीवनाशी निगडीत करणे.
4. जीवनीपयोगी जीवन विषयाशी संबंधित शिक्षण प्रकल्प राबवून बालक व पालक यांना त्यांच्या नैसर्गिक व सामाजिक वातावरणात शालेय पध्दत उपयुक्त आणि पोषक वाटेल, अशा त–हेने विविध माध्यमांतून शिक्षणाचे महत्व पटवून देणे.

**अंमलबजावणीचे स्वरूप :–**

1. भाषा, विज्ञान व गणित विषयांचे शाळा पातळीवर सहजरित्या उपलब्ध होणा–या साधन सामुग्रीद्वारे कृतीयुक्त अध्ययन उपक्रम/प्रयोग शाळा स्तरावर अभ्यास जत्रेच्या माध्यमातून घेण्यात यावेत. यासाठी शिक्षणोत्सव या कार्यक्रमांतर्गत मनपास्तरावरून मार्गदर्शन करण्यात आले आहे.
2. शासकीय व स्थानिक स्वराज्य नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये **"अभ्यास जत्रा"** हा **कार्यक्रम शिक्षणोत्सव** कार्यक्रमाच्या धर्तीवर जानेवारी 2015 ते मार्च 2015 या कालावधीत आयोजित करण्यात यावा.
3. **"अभ्यास जत्रेमध्ये"** विविध विषयांची दालने निर्माण करावीत. त्यामध्ये सादरीकरणासाठी आवश्यक साहित्याची मांडणी करण्यात यावी. विद्यार्थ्यांनी शिकलेल्या घटकांवर आधारित उपलब्ध साहित्याच्या आधारे उपस्थितांच्या समोर सादरीकरण करावे.
4. **"अभ्यास जत्रांचे"** आयोजन इयत्ता निहाय करावे. विद्यार्थ्यांनी उपस्थित पालक किंवा अन्य व्यक्ती यांना संबंधित विषयाचे प्रात्यक्षिक करून दाखवावे. त्यामध्ये इंग्रजी विषयाशी संबंधित संभाषण, विज्ञानातील प्रयोग, मराठी व इतिहासातील अभिवाचन नाटयीकरण, भूगोलातील नकाशाचे वाचन करून दाखविणे अशा प्रकारे अभ्यासक्रमाचे प्रत्यक्षात सादरीकरण करण्यात यावे.
5. या कार्यक्रमामध्ये शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक–पालक, माता पालक संघ, शिक्षणप्रेमी, शाळेतील सर्व विद्यार्थी–शिक्षक यांना सहभागी करून घेण्यात यावे. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी निधीची आवश्यकता असल्यास सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळा स्तरावर उपलब्ध असलेल्या शाळा अनुदानाचा उपयोग करण्यात यावा.
6. **"अभ्यास जत्रेच्या"** आयोजनामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, विचारांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्यात यावे. त्यासाठी सृजनात्मक कामाची मांडणी करण्याकरीता त्यांना पूरक अध्ययन फलक, नंदादीप फलक, विविध विषयांचे फलक यासारखे स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेले साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांचे उपस्थिती कार्ड (मागील बाजूस वाचन कार्ड) आणि तापमान नोंद कार्ड तयार करण्यात यावे. प्रत्येक वर्गामध्ये विषय निहाय अध्ययन कोपरा यापूर्वी तयार करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये विविध प्रकारचे शैक्षणोपयोगी साहित्य जसे–मणी, बटन, रबर बॅड्स, वर्तमान पत्र, मासिक इ. ठेवण्यात आलेले आहेत. त्याचे सक्षमीकरण करण्यात यावे. प्रत्येक विद्यार्थ्यास कृतीयुक्त शिक्षण, गट अध्ययन पध्दती, ज्ञान रचनावाद या माध्यमातून स्वयंअध्ययन करण्यास संधी प्राप्त करून द्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याचे ख–या अर्थाने सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन करण्यात यावे.

7. शाळा व्यवस्थापन समिती व पर्यवेक्षीय यंत्रणेने या **"अभ्यास जत्रांमध्ये"** सहभागी व्हावे. कामाचे व विद्यार्थ्यांच्या सादरीकरण मूल्यमापन करून अभिप्राय द्यावा. त्यामध्ये उत्कृष्ठ बाबी व सुधारणेस वाव असणा–या बाबींचा उल्लेख करण्यात यावा.
8. **"अभ्यास जत्रांमध्ये"** समूह साधन केंद्रांतर्गत प्रत्येक शाळेमध्ये राबविली जात असल्याची शहर साधन केंद समन्वयक व साधन व्यक्ति यांनी करावी. शाळा निरिक्षक / सहा. शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, अधिव्याख्याता, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, विभागीय उप संचालक यांनी निवडक शाळांमधी **"अभ्यास जत्रेमध्ये"** सहभागी व्हावे.
9. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका यांनी या कार्यक्रमाचे पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्यार आहेत.
10. सर्व शिक्षण संचालक, सह संचालक व शिक्षण उप संचालक यांनीही **"अभ्यास जत्रा"** या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे. तसेच त्यांचे अधिनस्त सर्व यंत्रणा या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कार्यान्वित करावी.

शिक्षण हक्क कायद्यातील तरतूदीनुसार बालकांना मैत्रीच्या व तणावरहित वातावरणात आनंददायी, भितीमुक्त शिक्षण दिले जावे, त्यातून त्याच्या चौकस बुध्दीला, संशोधक वृत्तीला वाव मिळावा आणि त्याच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा विकास व्हावा अशी अपेक्षा आहे. विज्ञान, गणित, कार्य शिक्षण उपक्रमांना शक्य तेथे कलात्मक साहित्यांची किंवा आविष्काराची जोड अभ्यास जत्रेच्या माध्यमातून देण्यात यावी. जेणेकरून या रूक्ष समजल्या जाणा–या विषयातील सौंदर्य आणि सर्वनशीलता वाढीस लागेल आणि कलात्मक आविष्कारामागे गणित, विज्ञानातील संबोध असू शकतात ही एकात्मतेची जाणीव निर्माण होईल. विद्यार्थी पालकांना व समाजास शाळेमध्ये राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाची माहिती कृतीमधून दाखवतील तसेच ज्ञानरचनावादातील कृतीतून शिक्षण प्राप्त होत असल्याची पडताळणी करता येईल, कृतीयुक्त शिक्षणातील घटकांचे नियोजन करण्यास मदत होईल. यासाठी **"अभ्यास जत्रा"** हा कार्यक्रम निश्चितपण उपयोगी ठरेल. त्या माध्यमातून बालकांना पाठयपुस्तकावर आधारित खेळ, प्रयोग असे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम करून पाहण्याची संधी मिळेल आणि हे उपक्रम अभ्यास जत्रेपुरते मर्यादित न राहता अध्ययन–अध्यापनातही वापरले जावेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना पालक व समाज यांच्यासमोर सादरीकरणाची संधी मिळेल व त्यांनाही विद्यार्थ्यांची प्रगती पाहता येईल. कार्यक्रमाच्या यशोगाथांचे अहवाल छायाचित्रणासह कार्यक्रमाच्या आयोजनानंतर दोन आठवडयाच्या आत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावेत.

शिक्षणाधिकारी
**नागपूर महानगरपालिका नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1. मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर.
2. मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर.
3. लेखाधिकारी सशिअ. म.न.पा. नागपूर
4. शाळा निरिक्षक, म.न.पा. नागपूर
5. .................................... शहर साधन समन्वयक, म.न.पा. नागपूर

स्वा
**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका नागपूर**

E:\Rahul\2014-15\Chavadi & Abhayas Jatra\Letter